सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :१४४२(२)(३)/२०२०/तेवीस

दिनांक : १३ डिसेंबर, २०२२

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय** :- पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीबाबत....
**संदर्भ** :- आयोगाची दिनांक २५ मे, २०२१ रोजीची घोषणा.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या भरती प्रक्रियेतील शारीरिक चाचणीच्या मानकांमध्ये सुधारणा करण्यात येऊन शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी (किमान ६० टक्के गुण) करण्यात आले असल्याचे तसेच सदर सुधारणा सन २०२० च्या होणाऱ्या स्पर्धा परीक्षेपासून लागू राहतील, असे आयोगाच्या संदर्भिय दिनांक २५ मे, २०२१ रोजीच्या घोषणेनुसार उमेदवारांना कळविण्यात आले होते.

२. आयोगाच्या दिनांक २५ मे, २०२१ रोजीच्या घोषणेद्वारे पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीसाठी लागू करण्यात आलेले बदल/मानके महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-२०२० च्या शारीरिक चाचणीसाठी लागू न करण्याचा निर्णय आयोगाकडून घेण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेच्या पदभरतीच्या जाहिरातीच्या वेळी लागू असलेला तसेच फेब्रुवारी, २०१८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या शारीरिक चाचणीच्या मानकानुसार शारीरिक चाचणी आयोजित करण्यात येईल.

३. फेब्रुवारी, २०१८ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या शारीरिक चाचणीच्या घटकांची मानके सोबतच्या परिशिष्ट-अ (पुरुष उमेदवारांकरीता) व परिशिष्ट-ब (महिला उमेदवारांकरीता) प्रमाणे प्रसिद्ध करण्यात येतआहेत.

४. प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे. तरी शारीरिक चाचणीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी शारीरिक चाचणीच्या सरावाच्या दृष्टीने कृपया याची नोंद घ्यावी व आवश्यकतेनुसार शारीरिक चाचणीसाठी सराव करावा.

उपसचिव,परीक्षोत्तर(अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

ठिकाण- मुंबई

## परिशिष्ट – अ

### पुरुष उमेदवारांकरिता

### महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा – २०२० (पोलीस उपनिरीक्षक)

**शारीरिक चाचणीमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :-**

(१) **धावणे** - यासाठी उमेदवारास ८०० मीटर ( अर्धा मैल ) धावावे लागेल व त्यास खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| संपूर्ण ८०० मीटरचे अंतर धावण्यास लागणारा कालावधी (मिनिटांमध्ये ) | गुण |
|---|---|
| २.३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................................... | ५० |
| २.३० मिनिटांपेक्षा जास्त परंतु २.४०मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी.................. | ४४ |
| २.४० मिनिटांपेक्षा जास्त परंतु २.५० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी .............. | ३७.५ |
| २.५० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३.०० मिनिटे किंवा त्यापेक्षा कम................ | ३१ |
| ३.०० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३.१० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी................ | २५ |
| ३.१०मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३.२० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................ | १९ |
| ३.२० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३.३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ............... | १२.५ |
| ३.३० मिनिटांपेक्षा जास्त.......................... .................. | ०० |

**उमेदवार ८०० मीटरचे अंतर धावू न शकल्यास त्यास शून्य गुण देण्यात येतील.**

(२) **पुलअप्स** - क्षितिज समांतर खांबावर उमेदवारास आठ पुलअप्स काढावे लागतील. यासाठी एकूण २० गुण देण्यात येतील म्हणजेच एका पुलअपसाठी २.५ गुण राहतील. उमेदवाराची छाती सहजपणे आडव्या खांबाला टेकल्यानंतर त्याने एक पुलअप् पूर्ण केला असे समजण्यात येईल असे करताना उमेदवाराने न झगडता आणी/अथवा आपले पाय न झाडता किंवा न वाकवता एक पुलअप् पूर्ण केल्यास त्यास पूर्ण २.५ गुण देण्यात येतील. पुलअप् काढताना उमेदवारास झगडावे लागले आणि अथवा त्याने आपले पाय झाडले किंवा वाकवले तर एका गुणांपर्यंत गुण कमी होतील. जर उमेदवारास पुलअप् काढता आला नाही म्हणजेच त्याला त्याची छाती आडव्या खांबाला टेकवता आली नाही तर त्या पुलअपसाठी त्याला एकही गुण मिळणार नाही.

(३) **गोळा फेक**-उमेदवारास ७.२६०किलोग्रॅम वजनाचा गोळा फेकावा लागेल. गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील:-

| गोळाफेकीचे अंतर | गुण |
|---|---|
| ७.५० मीटर किंवा जास्त .......... ...................... | १५ |
| ७.०० मीटर किंवा जास्त परंतु ७.५० मीटरपेक्षा कमी................ | १२.५ |
| ६.५० मीटर किंवा जास्त परंतु ७.०० मीटरपेक्षा कमी.............. | १० |
| ६.०० मीटर किंवा जास्त परंतु ६.५० मीटरपेक्षा कमी................ | ७.५ |
| ५.५० मीटर किंवा जास्त परंतु ६.०० मीटरपेक्षा कमी................ | ०५ |
| ५.०० मीटर किंवा जास्त परंतु ५.५० मीटरपेक्षा कमी................ | २.५ |
| ५.०० मीटरपेक्षा कमी | ०० |

**(अ)**गोळा फेकताना एक चूक क्षम्य असेल व त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत.

**(ब)** गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. **उदा. जर गोळाफेकीचे अंतर ६ मीटर असेल तर उमेदवाराला ७.५ गुण देण्यात येतील.**

(4) **लांब उडी** - यासाठी उमेदवाराला धावत येऊन लांब उडी मारावी लागेल. लांब उडीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील:-

| उडीचे अंतर | गुण |
|---|---|
| ४.५० मीटर किंवा जास्त .......... ...................... | १५ |
| ४.३५ मीटर किंवा जास्त परंतु ४.५० मीटरपेक्षा कमी.............. | १४ |
| ४.२० मीटर किंवा जास्त परंतु ४.३५ मीटरपेक्षा कमी............... | १२ |
| ३.९० मीटर किंवा जास्त परंतु ४.२० मीटरपेक्षा कमी .............. | १० |
| ३.६० मीटर किंवा जास्त परंतु ३.९० मीटरपेक्षा कमी............... | ०८ |
| ३.३० मीटर किंवा जास्त परंतु ३.६० मीटरपेक्षा कमी................ | ०६ |
| ३.०० मीटर किंवा जास्त परंतु ३.३० मीटरपेक्षा कमी................ | ०४ |
| २.५० मीटर किंवा जास्त परंतु ३.०० मीटरपेक्षा कमी............... | ०२ |
| २.५० मीटरपेक्षा कमी.... ............................... | ०० |

उमेदवारास फक्त एकच उडी मारण्याची परवानगी राहील. उडी मारताना अपघात झाल्यास किंवा चूक, म्हणजे उडी मारण्याच्या रेषेवर किंवा रेषेपलिकडे पहिले पाऊल टाकल्यास उमेदवारास एक जादा संधी देण्यात येईल व त्यासाठी गुण कमी केले जाणार नाहीत. जादा संधीचा फायदा घेताना पुन्हा चूक केल्यास वा अपघात घडल्यास उमेदवारास शून्य गुण देण्यात येतील.

**टीप**-(१) वरील चाचणी प्रकारच्या सरावासाठी उमेदवारांना राज्यातील पोलीस कवायत मैदानाचा उपयोग करता येईल. तसेच त्यांना पोलीस निदेशकाची मदत देण्यात येईल. परंतु यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपुर येथील पोलीस उप आयुक्त, पोलीस मुख्यालय आणि जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक कार्यालयाशी संपर्क साधावा.

**(२)** शारीरिक चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० टक्के गुण (म्हणजे ५० गुण) मिळणे आवश्यक आहे.

**(३)** सर्व चाचणीत एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास गुण Round Up करण्यासाठी त्यापुढील गुणाने पूर्णांकात करण्यात येऊन, शारीरिक चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.

*******

परिशिष्ट - ब

महिला उमेदवारांकरिता

**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा — २०२० (पोलीस उपनिरीक्षक)**

**शारीरिक चाचणीमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :-**

**(१) धावणे** - यासाठी उमेदवारास २०० मीटर धावावे लागेल व त्यास खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| संपूर्ण २०० मीटरचे अंतर धावण्यास लागणारा कालावधी (सेकंदांमध्ये ) | गुण |
|---|---|
| ३५ सेकंद व त्यापेक्षा कमी................................................................ | ४० |
| ३५ सेकंदांपेक्षा जास्त - ३६ सेकंदपर्यंत .......................................... | ३६ |
| ३६ सेकंदांपेक्षा जास्त - ३७ सेकंदपर्यंत.......................................... | ३२ |
| ३७ सेकंदांपेक्षा जास्त - ३८ सेकंदपर्यंत.......................................... | २८ |
| ३८ सेकंदांपेक्षा जास्त - ३९ सेकंदपर्यंत.......................................... | २४ |
| ३९ सेकंदांपेक्षा जास्त - ४० सेकंदपर्यंत.......................................... | २० |
| ४० सेकंदांपेक्षा जास्त - ४१ सेकंदपर्यंत.......................................... | १५ |
| ४१ सेकंदांपेक्षा जास्त - ४२ सेकंदपर्यंत.......................................... | १० |
| ४२ सेकंदांपेक्षा जास्त - ४३ सेकंदपर्यंत.......................................... | ०५ |
| ४३ सेकंदांपेक्षा जास्त - ....................................... ........................ | ०० |

**(२) चालणे** - यासाठी उमेदवारास ३ किलोमीटर्सचे अंतर चालावे लागेल व त्यासाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| ३ किलोमीटर्स चालण्यास लागणारा कालावधी (मिनिटांमध्ये) | गुण |
|---|---|
| २३ मिनिटे व त्यापेक्षा कमी....................................... ........................ | ४० |
| २३ मिनिटांपेक्षा जास्त — २४ मिनिटांपर्यंत....................................... ......... | ३५ |
| २४ मिनिटांपेक्षा जास्त — २५ मिनिटांपर्यंत....................................... ......... | ३० |
| २५ मिनिटांपेक्षा जास्त — २६ मिनिटांपर्यंत....................................... ......... | २२.५ |
| २६ मिनिटांपेक्षा जास्त — २७ मिनिटांपर्यंत....................................... ......... | १५ |
| २७ मिनिटांपेक्षा जास्त — २८ मिनिटांपर्यंत....................................... ......... | ७.५ |
| २८ मिनिटांपेक्षा जास्त....................................... ........ ........................ | ०० |

**चालणे :-** उमेदवाराने चालताना धावण्याचा प्रयत्न केला तर तिला चालण्याच्या Event मधून बाहेर काढण्याचा किंवा तिचे सदर Event चे गुण कमी करण्याचा अधिकार समितीस राहिल.

**(३) गोळा फेक** - उमेदवारास ४ किलो वजनाचा गोळा फेकावा लागेल. गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :--

| गोळाफेकीचे अंतर(मीटरमध्ये) | गुण |
|---|---|
| ६.०० मीटर व त्यापेक्षा जास्त.......................... ......... ........................ | २० |
| ५.५० मीटर व त्यापेक्षा जास्त —६.०० मीटरपेक्षा कमी......... ........................ | १७.५ |
| ५.०० मीटर व त्यापेक्षा जास्त — ५.५० मीटरपेक्षा कमी......... ........................ | १५ |
| ४.५० मीटर व त्यापेक्षा जास्त — ५.०० मीटरपेक्षा कमी......... ........................ | १२.५ |
| ४.०० मीटर व त्यापेक्षा जास्त — ४.५० मीटरपेक्षा कमी......... ........................ | ७.५ |
| ४.०० मीटरपेक्षा कमी ......... ........................ ......... ........................ .... | ०० |

**(अ)** गोळा फेकताना एक चूक क्षम्य असेल व त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत.

**(ब)**गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. उदा. **जर गोळाफेकीचे अंतर ५ मीटर असेल तर उमेदवाराला १५ गुण देण्यात येतील.**

**टीप**:-(१) वरील चाचणी प्रकारच्या सरावासाठी उमेदवारांना राज्यातील पोलीस कवायत मैदानाचा उपयोग करता येईल. तसेच त्यांना पोलीस निदेशकाची मदत देण्यात येईल. परंतु यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपुर येथील पोलीस उप आयुक्त, पोलीस मुख्यालय आणि जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक कार्यालयाशी संपर्क साधावा.

(२) शारीरिक चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० टक्के गुण (म्हणजे ५० गुण) मिळणे आवश्यक आहे.

(३) सर्व चाचणीत एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास गुण Round Up करण्यासाठी त्यापुढील गुणाने पूर्णांकात करण्यात येऊन, शारीरिक चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.

*******